R.N.I.16775/68 Regd. No. MCW-126/2018-20, Published on 15th of every month.




# देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाचार

एकूण पाने १६ प्रती अंक रु. ५/-
वर्ष ५२ वे, अंक १० वा, मुंबई. ऑगस्ट २०१९ वार्षिक वर्गणी रु. ५०/-

## काश्मीरचा विशेष दर्जा रद्द!

जम्मू आणि काश्मीर राज्याच्या विशेष दर्जाचा आधार असलेला "अनुच्छेद ३७०" रद्द करण्याचे ऐतिहासिक पाऊल मोदी सरकारने सोमवारी उचलले. त्याचबरोबर राज्याचे विभाजन करून जम्मू-काश्मीर आणि लदाख हे दोन स्वतंत्र केंद्रशासित प्रदेश करण्यात आले. जनसंघ आणि त्यानंतर भारतीय जनता पक्षाने गेली सत्तर वर्षे "अनुच्छेद ३७०" विरोधात राजकीय लढा दिला होता. या पक्षांच्या निवडणूक जाहीरनाम्यांत सातत्याने हा अनुच्छेद रद्द करण्याची ग्वाही दिली जात होती. त्या ग्वाहीचीच पूर्तता करताना काश्मीर प्रश्नाच्या मुळावरच घाव घातल्याचा दावा केला आहे. राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी सोमवारी सकाळी अधिसूचना जारी करीत "अनुच्छेद ३७०" रद्द केला. अनुच्छेद ३७० पूर्णतः संपुष्टात आणलेले नाही. त्यातील उपकलम १ कायम असून त्याद्वारे या अनुच्छेदातील अन्य सर्व विशेष लाभ राष्ट्रपतींनी विशेषाधिकारानुसार रद्द करण्यात गेले आहेत. अनुच्छेद ३७० रद्द झाल्याने याच अनुच्छेदाचा आधार घेऊन १९५४मध्ये लागू केलेला अनुच्छेद ३५-अ देखील आता घटनाबाह्य ठरला आहे. त्यामुळे राज्याबाहेरील नागरिकांना जम्मू-काश्मीरमध्ये मालमत्ता खरेदी करता येणार आहे. आर्थिक दुर्बलांसाठी लागू होणारे दहा टक्के आरक्षणही आपोआप लागू होईल. सध्या जम्मू-काश्मीरमध्ये राज्यपाल राजवट असल्याने हे विधेयक तेथील विधानसभेऐवजी संसदेत मांडण्यात आले. अनुच्छेद रद्द करण्याच्या प्रस्तावाबरोबरच जम्मू-काश्मीरचे विभाजन आणि हा संपूर्ण भूप्रदेश केंद्रशासित करणारे विधेयकही केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी मांडले. हे विधेयक १२५ विरुद्ध ६१ मतांनी संमत करण्यात आले. जम्मू-काश्मीर तसेच, लदाखला दहा टक्के आर्थिक आरक्षण लागू करणारे विधेयकही आवाजी मतदानाने संमत करण्यात आले. आप, बसप, तेलुगू देसम, तेलंगण राष्ट्र समिती, वायएसआर काँग्रेस या विरोधी पक्षांनी सत्ताधाऱ्यांना साथ दिल्याने मोदी सरकारला भाजपचा "वचननामा" पूर्ण करण्यात कोणतीही अडचणी आली नाही. अण्णाद्रमुक, शिवसेना, शिरोमणी अकाली दल या घटक पक्षांनी या ठरावाला पाठिंबा दिला, मात्र नीतिश कुमार यांच्या संयुक्त जनता दल या भाजप आघाडीतील घटक पक्षाने या हालचालींविरोधात सभात्याग करीत विरोध दर्शविला. अनुच्छदे ३७० रद्द करण्यास तसेच, जम्मू-काश्मीर केंद्रशासित करण्यास विरोध करत तृणमूल काँग्रेसनेही सभात्याग केला. काँग्रेसचा विरोध ३७० रद्द करण्यापेक्षाही राज्याच्या विभाजनाला होता. त्यांनी चर्चेत भाग घेऊन प्रस्ताव तसेच विधेयकाच्या विरोधात मतदान केले. अनुच्छेद ३७० चा प्रस्ताव आणि दोन विधेयके लोकसभेत सोमवारी संध्याकाळी मांडण्यात आली. त्यावर मंगळवारी सविस्तर चर्चा केली जाईल, असे गृहमंत्री अमित शाह यांनी सभागृहात सांगितले. राज्याच्या विभाजनाचे विधेयक लोकसभेत संमत झाल्यानंतर राष्ट्रपतींच्या स्वाक्षरीने जम्मू-काश्मीर केंद्रशासित होईल. **अजमेर दर्ग्याकडून अभिनंदन**, भारतीय उपखंडातील मुस्लिम समाजात भावनिक स्थान असलेल्या "अजमेर शरीफ दर्ग्या" तील प्रमुख गुरू झैनुल अबेदिन अलि खाँ यांनी कलम ३७० रद्द केल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचे अभिनंदन केले. दिशाभूल करणारे अतिरेकी आणि स्थानिक नेत्यांपासून काश्मीरमधील नागरिकांनी सावध राहावे आणि प्रमुख प्रवाहात सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले. **आणीबाणीचे स्मरण**, एका अधिसूचनेद्वारे एका फटक्यात कलम ३७० रद्द करण्याची राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांची कृती ही तत्कालीन राष्ट्रपती फक्रुद्दिन अलि अहमद यांच्या आणिबाणी लादण्याच्या अधिसूचनेची आठवण करून देणारी आहे.अशी टीका इतिहासाचे ज्येष्ठ अभ्यासक रामचंद्र गुहा यांनी केली.

**पुढील पानावर**




अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाजाची मुखपत्रिका

# समाचार

वर्ष ५२ वे, अंक १० वा, ऑगस्ट २०१९

(फक्त सभासदांसाठी)

❖❖❖

**श्री. विलास जोशी**
अध्यक्ष

**श्री. प्रभाकर कुलकर्णी**
कार्याध्यक्ष

**श्री. प्रसाद ठकार**
कार्यवाह

❖❖❖

***संपादक समिती***

श्री. प्रभाकर अ. संत
डॉ. लक्ष्मीकांत दाणी
श्री. शरद पां. पारसनीस
श्री. प्रमोद नाईक
श्री. बापूराव कुलकर्णी

❖❖❖

**अंकातील मजकूराशी मंडळ सहमत असेलच असे नाही**

**आजीव सभासद वर्गणी ५०० रुपये**
**प्रति अंक ५ रुपये**

**दूरध्वनी : २४३०२२७३, २४३०७५७३**

**ई मेल :** aadrbm@gmail.com
**संकेत स्थळ :** www.adrbmmahim.in


## भारताची मुलूखमैदान तोफ

अखेरच्या श्वासापर्यंत !
एकच आस! एकच ध्यास!
ज्वलंत ज्योतीने! 'सु'शमा'ने!
प्रखर परखड शारदेने!
अखंड खंडन खंडित भारता!
विविध भाषेने सहजी विणिले!
'स्वराज' वाणीने!
कधि भासे जणु झाँशी राणी!
जाज्वल्य देशप्रेमी
हिंदुत्वाची सार्थ निशाणी!
कुंकुम मांग भरूनी!
वावरली अखंड त्रिभुवनी!
सौभाग्य खेचून आणी!
अखंड भारत 'विनायकी' स्वप्न!
'विधी'(कायदा)स अभ्यासून!
गर्जुन टाकी संसद'अटल'
'लाल''राम''सुषमा'अविरत!अविचल!
'अन्सारी' दिधला मायेचा हात!
किति ती सांगु! गुण अलौकिक!
शमेच्या 'सु'षमेच्या अखंड तेवण्याचे!
ज्योती जी!'सुषमा' जी होती
तेजाची आरती! तेजाची!!

सुषमा स्वराज यांचा जन्म १४ फेब्रुवारी १९५२ रोजी हरियाणा (तेव्हाचे पंजाब) राज्य की अम्बाला छावणी येथे झाला होता. अम्बाला छावणीतीलच एस.डी. कॉलेजमध्ये बीए केल्यानंतर त्यांनी चंडीगढमधील पंजाब विश्वविद्यालयातून कायद्याची पदवी घेतली होती. आणीबाणीला प्रखर विरोध केल्यानंतर त्या सक्रीय राजकारणात सहभागी झाल्या. सन २०१४ मध्ये भारताच्या पहिल्या महिला परराष्ट्र मंत्री म्हणण्याचे भाग्य त्यांना लाभले. दिल्लीच्या पहिल्या महिला मुख्यमंत्री आणि एवाद्या राजकीय पक्षाच्या पहिल्या महिला प्रवक्ता बनण्याचा मानही त्यांच्या नावे आहे. सन १९७३ मध्ये त्यांना विश्वविद्यालयाने सर्वोच्च वक्त्याचा पुरस्कार दिला. १९७३ मध्ये सुषमा स्वराज सर्वोच्च न्यायलयात अधिवक्ता या पदावर कार्य करू लागल्या. सत्तरच्या दशकात सुषमा स्वराज अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेशी जोडल्या गेल्या. आणीबाणीच्यावेळी जयप्रकाश नारायण यांच्या आंदोलनातच सहभागी होणाऱ्या सुषमा आणीबाणीच्या समाप्तीनंतर जनता पक्षाच्या सदस्य बनल्या. सन १९७७ मध्ये त्यांनी अम्बाला छावणी विधानसभा क्षेत्रातून हरयाणा विधानसभा निवडणूक लढवली आणि चौधरी देवीलाल यांच्या सरकारमध्ये वयाच्या २५व्या वर्षी त्या कॅबीनेट मंत्री बनल्या. हा एक विक्रमच होता. ८०च्या दशकात भारतीय जनता पक्षाची स्थापना झाल्यानंतर सुषमा या पक्षात सामील झाल्या. भाजप-लोकदलाच्या संयुक्त सरकारमध्ये त्या शिक्षणमंत्री होत्या. १९९६ मध्ये दक्षिण दिल्ली लोकसभा मतदारसंघातून निवडणूक जिंकली आणि अटल बिहारी वाजपेयी सरकारमध्ये त्या माहिती आणि प्रसारण मंत्री बनल्या. मार्च १९९८ मध्ये सुषमा टेलिकॉम मंत्रालयाच्या अतिरिक्त प्रभारासह पुन्हा माहिती आणि प्रसारण मंत्री बनल्या. १२ ऑक्टोबर १९९८ रोजी दिल्लीच्या पहिल्या मुख्यमंत्री म्हणून कार्यभार हाती घेतला. एप्रिल २००० मध्ये त्या उत्तर प्रदेशमधून राज्यसभा सदस्य म्हणून संसदेत परतल्या होत्या. त्या क्रेंदीय मंत्रिमंडळात पुन्हा माहिती आणि प्रसारण मंत्री म्हणून कार्यरत होत्या. सन २००३ मध्ये त्या आरोग्य, कुटुंबकल्याण आणि संसदीय कार्यमंत्री बनल्या आणि मे २००४ पर्यंत ते या पदावर होत्या. एप्रिल, २००६ मध्ये स्वराज या राज्यसभेवर तिसऱ्यांदा निवडून आल्या. २१ डिसेंबर २००९ मध्ये त्या १५व्या लोकसभेत विरोधी पक्षनेत्या म्हणून निवडल्या गेल्या. २०१४मध्ये त्या विदिशामधून पुन्हा निवडून आल्या. त्या नरेंद्र मोदी यांच्या मंत्रिमंडळात परराष्ट्रमंत्री होत्या. या काळात मोदी यांचे परराष्ट्र धोरण त्यांनी अतिशय ताकदीने निभावले.

मध्यवर्ती मंडळातर्फे दिल्या जाणाऱ्या पारितोषिकांसाठी ३०/०९/२०१९ पर्यंत अर्ज करावेत. त्यानंतर आलेल्या अर्जांच्या विचार केला जाणार नाही. गेल्या महिन्याच्या अंकात जी माहिती दिली आहे तीही विचारात घेणे. आज पर्यंत संस्थेला शैक्षणिक मदतीसाठी मिळालेल्या देणग्यांवर आधारित प्रतिवर्षी देण्यात येणाऱ्या शैक्षणिक पारितोषिकाची यादी.

दहावी (एस.एस.सी. बोर्ड) परिक्षेत सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थी / विद्यार्थिनीस

१. मुंबई, कल्याण, डोंबिवली, ठाणे विभागातून सर्व विषयांत सर्वाधिक गुण मिळविणाऱ्यास २००० रुपये.

२. पुणे जिल्हा सर्व विषयांत सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थिनीस १००० रुपये.

३. अलिबाग जिल्हा सर्व विषयांत सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थिनीस १००० रुपये.

४. नागपूर / विदर्भ सर्व विषयांत सर्वाधिक गुण १०० रुपये.

५. सोलापूर, बेळगाव, कोल्हापूर, मुंबई सोलापूर जिल्ह्यातुन प्रथम येणाऱ्या विद्यार्थी / विद्यार्थिनीस १२५० रुपये.

६. सोलापूर, बेळगाव, कोल्हापूर, मुंबई संस्कृत विषयात सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थी / विद्यार्थिनीस २५०० रुपये.

७. सोलापूर, बेळगाव, कोल्हापूर, मुंबई, नाशिक सायन्स विषयात सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थी / विद्यार्थिनीस ५०० रुपये.

८. सोलापूर, बेळगाव, कोल्हापूर, मुंबई गणित विषयात सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थी / विद्यार्थिनीस १५०० रुपये.

९. सोलापूर, बेळगाव, कोल्हापूर, मुंबई, नागपूर तात्रिक शिक्षण विषयात सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थी / विद्यार्थिनीस १००० रुपये.

१०. सोलापूर, बेळगाव, कोल्हापूर, ठाणे इंग्रजी विषयात सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थी / विद्यार्थिनीस ५०० रुपये.

११. सोलापूर, बेळगाव, कोल्हापूर, मुंबई समाजशास्त्र विषयात सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थी / विद्यार्थिनीस ५०० रुपये.

१२. सोलापूर, नांदेड, लातूर मराठी विषयात सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थी / विद्यार्थिनीस २००० रुपये.

**बारावी (एच.एस.सी.बोर्ड) परिक्षेत सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थिनीस**

१३. मुंबई, ठाणे, कल्याण, डोंबिवली सहित ९० टक्के पेक्षा जास्त गुण मिळविणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थिनीस २००० रुपये.

१४. पुणे केंद्र ९० टक्के पेक्षा जास्त गुण मिळविणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थिनीस १००० रुपये.

१५. सोलापूर केंद्र ९० टक्के पेक्षा जास्त गुण मिळविणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थिनीस १००० रुपये.

**१२वी नंतर वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थी / विद्यार्थिनीस** १६. ॲलोपॅथीचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थी / विद्यार्थिनीस २५०० रुपये. १७. होमियोपॅथीचे आयुर्वेदिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थिनीस १००० रुपये.

**इंजिनिअरींग शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थी / विद्यार्थिनीस**

१८. मेकॅनिकल इंजिनिअरींग शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थी / विद्यार्थिनीस २५०० रुपये.

१९. इलेक्ट्रिकल इंजिनिअरींग शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थी / विद्यार्थिनीस २५०० रुपये.

२०. सिव्हिल इंजिनिअरींग शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थी / विद्यार्थिनीस २५०० रुपये.

२१. इलेक्ट्रानिक्स इंजिनिअरींग शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थी / विद्यार्थिनीस २५०० रुपये.

२२. कॉम्प्युटर सायन्स इंजिनिअरींग शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थी / विद्यार्थिनीस ५००० रुपये.

२३. **चार्टर्ड अकाउंटंट** शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थी / विद्यार्थिनीस (दरवर्षी मार्कलिस्ट पाठविणे) २५०० रुपये.

२४. **आर्किटेक्ट-वास्तुविशारद** हे शिक्षण घेणाऱ्यास विद्यार्थी/विद्यार्थिनीस सोबत मार्कलिस्ट पाठविणे २५०० रुपये.

२५. **पदवी परीक्षा बी.ई.** परीक्षेत सर्वाधिक गुण मिळविणाऱ्यास विद्यार्थी/विद्यार्थिनीस २५०० रुपये.

२६. मेकॅनिकल इंजिनिअर, इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअर, सिव्हिल इंजिनिअर, कॉम्प्युटर सायन्स, केमिकल इंजिनिअर विद्यार्थी/विद्यार्थिनीस (सोबत दरवर्षी मार्कलिस्ट पाठविणे) २५०० रुपये.

२७. **बी.कॉम.** परीक्षेत प्रथम येणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थिनीस २५०० रुपये.

**बी.एस.सी.** २८. बी.एस.सी. परीक्षेत प्रथम येणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थिनीस २५०० रुपये.

२९. बी.एस.सी. ॲग्रीकल्चर मध्ये सर्वाधिक गुण परीक्षेत प्रथम येणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थिनीस २५०० रुपये.

३०. बी.एस.सी. नर्सिंग किंवा होम सायन्स घेणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थीनीस २५०० रुपये.

३१. **चार्टर्ड अकाउंटंट अंतिम परीक्षेत** सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थिनीस ५००० रुपये.

३२. **एल.एल.बी.अंतिम परीक्षेत** सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थिनीस ५००० रुपये.

३३. **कॉस्ट अकाउंटंट अंतिम परीक्षेत** सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थिनीस ५०० रुपये.

३४. **कंपनी सेक्रटरी अंतिम परीक्षेत** सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थिनीस ५०० रुपये.

**एम.बी.ए.** ३५. एम.बी.ए. मार्केटिंग मॅनेजमेंट परीक्षेत गुण मिळविणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थिनीस ५०० रुपये.

३६. एम.बी.ए. फायनान्स परीक्षेत सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थिनीस ५००० रुपये.

**बी.ए.** ३७. बी.ए. परीक्षेत सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थीनीस २५०० रुपये.

३८. बी.ए. परीक्षेत मराठी विषयात सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थी / विद्यार्थिनीस २५०० रुपये.

३९. बी.ए. परीक्षेत संस्कृत विषयात सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थी / विद्यार्थिनीस २५०० रुपये.

४०. **संगीत विषयाचा अभ्यासक्रम** गांधर्व महाविद्यालयातून घेणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थिनीस (प्रती वर्षी प्रगती पाहून) २५०० रुपये.

४१. **एम.ए.** परीक्षेत मराठी विषयात सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थिनीस २५०० रुपये.

४२. **मास्टर ऑफ मॅनेजमेंट स्टडी** या अभ्यासक्रमात सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थिनीस ५००० रुपये.

४३. **बी.एड. अथवा डी.एड.** परीक्षेत सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या जळगाव मधील विद्यार्थि / विद्यार्थिनीस १००० रुपये.

**आर्थिक दुर्बळ गरीब विद्यार्थी / विद्यार्थिनीस पारितोषिके**

४४. **मेडीकल** मध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थी / विद्यार्थिनीस (प्रती वर्षी प्रगती पाहून) २५०० रुपये.

४५. **कमर्शिअल आर्ट** या परीक्षेत सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थी / विद्यार्थिनीस (प्रती वर्षी प्रगती पाहून) १००० रुपये.

४६. **आय.आय.टी.** परीक्षेत सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थी / विद्यार्थिनीस (प्रति वर्षी प्रगती पाहून) ५००० रुपये.

४७. आय.पी.एस./आय.ए.एस. अभ्यासक्रम घेणाऱ्या विद्यार्थी / विद्यार्थिनीस (प्रगती पाहून) ५००० रुपये.

४८. आपल्या संस्थेच्या गरजू कर्मचाऱ्याच्या मुलगा किंवा मुलगी अशा एका अपत्याला वार्षिक मदत १००० रुपये.

वैयक्तिक खास पारितोषिकांची याद

कै. शंकर वामन देशपांडे यांच्या स्मृती प्रित्यर्थ श्री. विवेक कृष्ण देशपांडे यांच्या आजोबांच्या स्मरणार्थ रु. १,००,०००/- (रुपये एक लाख मात्र) शिष्यवृत्ती देणगी दिली आहे. याच्या अंतर्गत प्रतिवर्षी...

४९. इंजिनिअरींग अभ्यासक्रम घेणाऱ्या होतकरु मुंबई आणि पर्यंतचा राहिवासी विद्यार्थी/विद्यार्थिनीस ८००० रुपये.

कै. केशवराव देशमुख संगरोळी यांनी दिलेल्या रु. ३०,०००/- (रुपये तीस हजार मात्र) या देणगीतून...

५०. मराठी विषयात दहावीमध्ये सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थिनीस २५०० रुपये.

विशेष सूचना: वरील यादीमध्ये कुठल्याही देणगीदाराला काही सुचना, बदल, आक्षेप असेल तर किंवा अनवधानाने कुठल्याही पारितोषिकाचे नाव राहून गेले असेल तर त्यांनी ते ३१ जुलै २०१९ पर्यंत संस्थेला लिखित स्वरुपात कळवावे. त्याची नोंद संस्था घेईल व संस्थेला आवश्यक वाटल्यास योग्य ती कारवाई करण्याचा प्रयत्न संस्था करेल.

वरील शैक्षणिक पारितोषिकांशिवाय दरवर्षी संस्थेतर्फे देण्यात येणाऱ्या हुशार विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदतीचा उपक्रम राबविला जाईल. फक्त त्यासाठी संलग्न संस्थांनी शक्यतो ८०टक्के वर गुण मिळविणाऱ्या विद्यार्थी / विद्यार्थिनीची नावे आवश्यक त्या कागदपत्रासह व त्यांच्या शिफारसींसह पाठव्याव्यात. त्याप्रमाणे दरवर्षीप्रमाणे त्यांनाही शैक्षणिक शिष्यवृत्ती देण्यात येईल.

श्री. प्रभाकर कुलकर्णी, कार्याध्यक्ष - श्री. दिपक कुलकर्णी, शैक्षणिक समिती संयोजक

# एक रेस सुरु होते आणि जगायचं राहून जात

- डॉ. लक्ष्मीकांत दाणी, मो. ९८२०४ ३७०७३
email : laxmikant1411@yahoo.com

एक तरुण interview रुम मध्ये बसला होता, समोर तीन professionals चष्मा आणि Tie लावून बसले होते. Executive engineer ने तरुणाकडे पाहून विचारले, "tell me, जिथे खूप पाऊस पडतो, तिथे जास्त प्रमाणात काय निर्माण होतं ?" तरुणाने उत्तर दिलं, 'छत्र्या!" दुसऱ्या Tie वाल्या लठ्ठ CEO ने विचारलं- 'यावर्षी पद्मश्री कोणाला मिळाली ?" तरुणाने उत्तर दिलं, 'मला... कारण माझं नुकतंच लग्न झालं असून बायकोच नाव आहे पद्मश्री!!" तिसरा Regional manager वैतागून म्हणाला 'काही डोक आहे का तुला ?" तरुणाने शांतपणे उत्तर दिलं, 'हो, खूप डोक आहे, शाळेत भरती झाल्यापासून ह्या interview पर्यंत सगळे जण तेच खात आहेत." Executive engineer ने विचारलं, 'तुझ्या bio-data मध्ये MA, BFT डिग्री लिहिली आहे, काय आहे ही पदवी ?" तरुणाने पुन्हा शांतपणे उत्तर दिलं, 'Matric appeared but failed thrice" त्यावर CEO ने चिडून फाईल आपटली आणि ओरडला- 'फार मोठा गाढव आहेस तू!!" तरुण तितक्याच शांतपणे म्हणाला 'साहेब, मोठे तर तुम्ही आहात, मी तर फार लहान आहे" एक पिढी शिक्षण घेवून गाढव बनली आणि आता नवी पिढी शिक्षण घेताना रेसचा घोडा बनत आहे. परीक्षेत १००% पाहिजेत, कराटे क्लासमध्ये Black बेल्ट मिळवायचा आहे. त्यानंतर dance क्लास attend करायचा. भगवतगीता स्पर्धेत जायचं आहे, श्लोकांचा अर्थ कळला नाही तरी ते तोंडपाठ करायचेच. कारण first prize मिळालंच पाहिजे!! मग drawing competition असते. तिथून बाहेर निघाला की चालला तबला वाजवायला... संगीत विशारद बनायला. Albert Einstein बनवून देणाऱ्या Multi-national school आल्या. पण Albert हा Einstein बनण्यासाठी शाळेत गेला नव्हता. एक अमिताभ बनला तर हजारो acting school उभ्या राहिल्या. पण अमिताभ अभिनेता बनण्यासाठी कोणत्याही school मध्ये गेला नव्हता. आता लवकरच मोदी तयार करणाऱ्या शाळा उभ्या राहतील. आणि पालक लाखो रुपये फी भरून त्यात मुलांना पाठवतील. आज मुलाच्या शिक्षणासाठी जेवढा खर्च एका वर्षाला होतो, तितके रुपये त्याच्या पालकांना संपूर्ण शिक्षण घेण्यासाठी सुध्दा लागले नाहीत. आता शाळा सुरु केल्या आहेत investors नी मागणी तसा पुरवठा ह्या तत्वावर पालकांना आपल्या मुला-मुलीला रेसचा घोडा बनवायचं आहे ही मागणी पाहून जास्तीत जास्त अभ्यास मुलांच्या डोक्यात कोंबायला सुरुवात केली. दप्तराचं आणि पालक-शिक्षकांचं अपेक्षांचं ओझं वाहणारी मुले म्हणजे चालती बोलती प्रेते बनत चालली आहेत. जरा शुद्धीवर आली की "what is square of 12?" असं विचारुन त्यांचं बालपण चिरडून टाकतात.

श्री. मोदी ह्यांनी मुलांना प्रश्न विचारला होता-'तुमच्यापैकी किती जण घाम गळेपर्यंत खेळतात ?" तेव्हा एकाही मुलाने हात वर केला नाही. कारण आता मुले AC मध्ये जन्म घेतात, AC मध्ये वाढतात. चिप्स खातात. soft ड्रिंक पितात आणि mobile वर game खेळत बसतात. ऊन, पाऊस, वारा ह्याच्याशी संबंध येत नाही. पडणं-लागणं, खेळात हरणे माहीतच नाही. School Bus आली नाही तर शाळेपर्यंत चालत जाण्याची ताकद मुलांमध्ये नाही. वय वर्ष ६ पार होत नाही तर शाळेपर्यंत चालत जाण्याची ताकद मुलांमध्ये नाही. वय वर्ष ६ पार होत नाही तर डोळ्याला चष्मा लागतो. हाता पायांच्या एकतर काड्या होतात नाहीतर लठ्ठपणा वाढतो. कारण शारीरिक कष्ट संपले आणि Modified food starch, maltodextrin, hydrolyzed corn gluten, disodium inosinate/guanylate, yeast extrac, hydrolyzed soy protein मिसळलेले पदार्थ खाणे सुरु झाले. ह्या ingredients ची खासियत म्हणजे ते मुलांच्या पोटात शिरुन जास्त काळ टिकतात आणि पोटातील पोषके शोषून घेतात. मुलांची hormonal आणि जैविक वाढ रोखतात. ज्यामुळे मुले दुबळी होत जातात. हे घटक पिझ्झा-बर्गर मध्ये असतात. म्हणून भारत लवकरच diabetes चे सर्वाधिक रुग्ण असलेला देश बनणार आहे. सोबत इतरही विकार येत आहेत. शेंगदाणे, चणे, रवा, तांदूळ, बाजरी, सुका मेवा आणि फळे ह्यात घातक ingredients नसतात. लापशी, सातू, शिरा, पोहे किंवा अंड्याचे घरी बनवलेले पदार्थ मुलांना उत्तम पोषण पुरवतात. ते मिळत नसल्यामुळे मुलांची शारीरिक वाढ होत नाही. प्रतिकार क्षमता संपते. मग vitamins, DHA, minerals देणारे product विकत आणून ते खायला देतात. वास्तविक, शरीर हा जगातील सर्वात मोठा कारखाना आहे.

ह्याच शरीराला योग्य आहार, कष्ट मिळाले तर कुठेही तयार न होऊ शकणारं रक्त तयार होतं. साध्या भाज्या, अस्सल भारतीय जेवण मिळालं की शरीराची यंत्रणा स्वतः काम करते. म्हणून ताज्या भाज्या, भाकरी खाणारी आणि मिनरल्स, calcium, proteins माहित नसलेली माणसे १०० वर्षे जगली आणि हे माहित झालेली माणसे फक्त ६० वर्षे जगतात... तेही अनेक रोग सोसत, औषधे घेवून!! खेळ, व्यायाम, भटकंती आणि दर्जेदार वाचन न केल्यामुळे मुलांना मानसिक कमतरता जाणवते. संघर्ष माहित नसतो आणि team work कळत नाही. मित्र फक्त whatsapp, facebook वर भेटतात. प्रत्यक्ष भेट नाही. सुख-दुखाची देवाणघेवाण नाही आणि मित्राचा-मैत्रिणीचा मानसिक आधार नाही. दिलखुलास हसणे आणि ओक्साबोक्शी रडणे मानसिक आरोग्यासाठी चांगले असते. ह्या दोन्ही क्रिया मुलांना करता येत नाहीत. आपोआपच, जरा मनाविरुद्ध घडलं की लहान मुले-मुली आत्महत्या करतात. बरीच एकुलती एक मुले दुसऱ्याशी जमवून घेण्याची सवय नसल्यामुळे पुढे लग्न झाल्यावर वर्षभरात घटस्फोट घेतात. ज्या मुलांना बहिण नसते, चागंली मैत्रीण नसते त्यांचा स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टीकोन संकुचित बनतो. ह्या उणीवांचा शिक्षणात विचार केलेलाच नाही. भारतीय शिक्षण पद्धत सर्वांगीण नाही हे शिक्षण तज्ञ सांगत होते तोवर शिक्षणाचा धंदा सुरु झाला. मोठे उद्योजग, पुढाऱ्यांनी शाळांमधून गुंतवणूक करून शिक्षण संकल्पनेला धूळ चारली. एखादी स्त्री गरोदर राहिली तर जन्माला येणाऱ्या जीवाच्या admission ची तयारी सुरु होते. कृष्णाला जन्मण्याआधी मारायची तयारी मामाने केली होती. आता मुल जन्माला येण्याआधी त्याला रेसचा घोडा बनवायची तयारी सुरु होते. आता मुलाने बोलायला सुरुवात केली की थेट E=Mc square म्हणायचं बाकी राहिलं आहे. अशी मुले सर्व formula पटापट म्हणून दाखवतील पण स्वतःचा formula कधीही शोधू शकणार नाहीत. Guitar शिकतील पण स्वतःची संगीत रचना करु शकणार नाहीत. लता मंगेशकर, सचिन तेंडूलकर, मेरी कोम ह्यांचं अनुकरण अचूक करतील. पण स्वतःची ओळख निर्माण करणार नाहीत. कारण त्यांना फक्त अनुकरण करायला शिकवलं जातं. जगायची कला, गीत-संगीतातील आनंद, निसर्गसंपदेची भव्यता, नव्या संकल्पनांची निर्मिती, जुन्या विचारांचा आधार, साहित्य ह्याला बाजारु किंमत नसल्यामुळे फक्त जे विकलं जातं तेच ज्ञान मुलांना मिळतंय, त्यात ते पारंगत होत आहेत. काही जणांना campus मध्ये दर महिना ४ लाखांपेक्षा जास्त पगार असणारी नोकरी मिळतेय... पण त्यात देशाचं नाही, भांडवलदारांचां हित साधला जातंय, पुढची पिढी मोठी पदवी मिळवेल पण न स्वतः जगण्याचा आनंद लुटू शकतील, न दुसऱ्याला जगण्याची मजा मिळू देतील... अगदी हाच धोका ओळखून जपानमध्ये शाळेत AC लावत नाहीत. तिथे मुलांना घोकंपट्टी पेक्षा practical वर भर देतात. वृक्ष-वेली स्वतःच अन्न स्वतः तयार करतात त्या प्रक्रियेला काय म्हणतात ?... असे प्रश्न विद्यार्थ्यांना न विचारता शाळेत व बाहेर भाजी लावायला शिकवतात. त्या रोपांची-वेलींची जोपासना करायला लावतात. 'निप्पोन technology" ने केलेल्या तपासणीत म्हटलं आहे की शाळेच्या आवारातील वेलींमुळे तापमान चार अंश कमी झाल आहे, आणि मुले पाना-फुलांसोबत भावनिक नात जोडू लागली आहेत. जर्मनी मुलांना Transference शिक्षण देते. तिथे लहान मुलांची बोटे नाजूक असतात हे लक्षात घेवून दुसरी पर्यंत लेखन करु देत नाहीत. पाचवीपर्यंत practical चालतं आणि त्यानंतर विद्यार्थी बँक कर्मचारी बनेल की हवाई सेविका, प्रशासन सांभाळेल की कुशल कामगार होईल ह्याची सतत तपासणी होते. दहावीनंतर फक्त त्याला आवडणाऱ्या क्षेत्रांच प्रशिक्षण देतात. सगळे एकदम science मध्ये भरत नाहीत. अनावश्यक विषय शिकवत नाहीत. चीन हा cycle प्रेमी देश ४ वर्षाच्या मुलांना cycle चालवण्याच शिक्षण देतो. त्यानंतर theory कमी आणि प्रत्यक्ष कृती शिकवतात. प्रत्येक विद्यार्थी उद्या देश चालवणार ह्याचा विचार Netherlands सारखा देशही करतो. एकाच विद्यार्थ्यावर सगळ्या विषयांचा मारा करत नाहीत. चारी दिशांनी अनेक विषय आणि क्लासचा मारा सोसण्याच काम भारतीय विद्यार्थ्यांना करावे लागते. शिक्षण काय असतं ? रवींद्रनाथ टागोर काय म्हणतात पहा. टागोरांची 'शांतीनिकेतन" शाळा झाडांखाली भरत असे. पक्ष्यांची किलबिल ऐकू येई. एकदा टागोर झाडाखाली बसले होते. चार विद्यार्थी त्यांच्या समोर पुस्तकात डोक खुपसून बसली होती. आणि उरलेली बरीच मुले खेळत-बागडत होती. कोणी झाडावर चढला होता, कोणी फुलांचा सुगंध घेत फिरत होता. तेवढ्यात एक पालक तिथे आले. पाहतात तर काय... गुरुदेव शांतपणे बसले होते आणि फक्त चार मुले पुस्तकात डोके खुपसून बसली होती व इतर मुले हसण्यात-नाचण्यात

रमली होती. सुटा-बुटातील पालक महाशय टागोरांना म्हणाले-'या नाचणाऱ्या-बागडणाऱ्या मुलांच्या भवितव्याची तुम्हाला चिंता वाटत नाही का ?" टागोर म्हणाले-'चिंता वाटते, पण नाचणाऱ्या-बागडणाऱ्या मुलांची नाही तर पुस्तकात तोंड खुपसून बसलेल्या मुलांची. ही मुले खेळण्या बागडण्याच्या वयात मोठ्या माणसासारखी वागत आहेत. ही मुले लहान वयात प्रौढ झाली आहेत. प्रौढ तर मीसुद्धा अजून झालो नाही. खरं तर मलाही झाडावर चढाव असं वाटतं. पक्ष्यांशी बोलावसं वाटत. भरपूर खेळावस वाटतं. पण माझ शरीर आता साथ देत नाही." टागोर जगण्यासाठी शिकवत होते. आता शिकण्यासाठी जगावे लागते. जास्त ज्ञान, जास्त कला घेवून मुले धावत असतात. आणि पालक त्यांच्यावर पैसे लावतात! मग एक रेस सुरु होते आणि जगायचं राहून जातं!! **सुविचार :** कोणी कोणाला काही द्यावे ही अपेक्षा नसते **दोन शब्द गोड** बोलावे हेच लाख मोलाचे असते. • चांगल्या **मित्रांची साथ** मिळायला **भाग्य** लागतं आणि ती कायमस्वरुपी टिकून राहण्यासाठी **मन साफ** असावं लागतं. • जिवंत आहे तोपर्यंत **नात्याला वेळ** द्या कारण ताजमहाल जगाने पाहीलाय मुमताज ने नाही. • जिथे **प्रयत्नांची उंची** मोठी असते तिथे **नशीबाला** पण कमीपणा घ्यावा लागतो. • सुंदर क्षणांची वाट पाहण्यापेक्षा लाभलेला क्षण सुंदर करा. • सर्वात सुक्ष्म आणि ताकदवान काय असेल तर ते म्हणजे '**विचार**" कारण उध्वस्त आणि परिवर्तन करण्याची त्याची शक्ती अफाट आहे. • खुप त्रास असतानाही प्रामाणिक रहाणे, संपत्ती भरपूर असतानाही साधे राहणे, अधिकार असतानाही नम्र राहणे आणि रागात असतानाही शांत रहाणे यालाच **जीवनाचे व्यवस्थापन** म्हणतात.

---

## देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मंडळ हैदराबाद

श्री. प्रदीप कुलकर्णी दे. ऋ. मध्यवर्ती मंडळ, मुंबई आणि बृहन् महाराष्ट्र मंडळ दिल्ली ह्यांचे उपाध्यक्ष म्हणून कार्यरत असलेले ऐक निपूण व्यक्तिमत्व दि. ५-७-२०१९ शुक्रवारी ६.०० वाजता ह्यांचे निधन झाल्याची बातमी मिळाली. एक असामान्य व्यक्ती आपल्यातून निघून गेल्यामुळे मोठी पोकळी निर्माण झाल्याची जाणीव होत आहे. दि. ७.७.२०१९ रोजी दे. ऋ. ब्रा. मंडळाचे सर्व पदाधिकारी व कार्यकारिणी सदस्य ह्यांची सभा झाली. सर्व उपस्थितांना श्री. प्रदीप कुलकर्णी ह्यांचे निधन झालेले असल्यामुळे उपस्थितांनी दुःख व्यक्त केले. मी श्री. श्रीरसागर, अध्यक्ष व श्री. पद्माकर अत्रे, कार्यवाह व इतर पदाधिकारी व सदस्य दुःखात सहभागी आहोत.

---

दि. ७.७.२०१९ रोजी देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मंडळ हैदराबाद ह्यांच्या सर्व पदाधिकारी व सदस्य ह्यांची बैठक जगागिरदार वाडा, मंडळ कार्यालय येथे संपन्न झाली. वरील बैठकीमध्ये कार्यवाह व इतर पदाधिकारी व सदस्यांनी बैठकीत्तर विषयामध्ये खाली ठराव संमत केला. श्री. मदन क्षिरसागर अध्यक्ष, देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मंडळ हैदराबाद ह्यांच्या दोन कन्या कु. श्वेता व कु. रिया क्षिरसागर ह्यांनी तेलंगणा राज्याचे रोलिंग स्केट रौलर हॉकी ह्या खेळाच्या स्पर्धामध्ये नैपुण्य, घेऊन भारतीचे प्रतिनिधित्व करण्यासाठी त्यांचे नांवावर सम्मती होऊन वरील खेळासाठी भारत सरकार तर्फे निवड करण्यात आली. खेळ आंतरदेशीय........ येथे होत असून श्वेता व कु. रिया भारताचे रोलिंग स्केट या स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करतील. म्हणून मंडळाच्या सर्व पदाधिकारी व सदस्यांतर्फे त्यांचे अभिनंदन करून त्यांना कार्यनंदन पत्र मंडळातर्फे देत आहोत व त्यांचे कौतुक करत आहोत. मध्यवर्ती मंडळातर्फे अभिनंदन!

---

## बडोद्याच्या श्री. डॉ. श्रीनिवास सोलापूरकर यांचे अभिनंदन!

डॉ. श्रीनिवास सोलापूरकर, अध्यक्ष, दे.ऋ.ब्रा.मंडळ, वडोदरा, मध्यवर्ती मंडळाचे आजीव सभासद आहेत. जानेवारी २०१९ ते जून २०१९ दरम्यान त्यांना खालील प्रमाणे तीन अवार्ड मिळाले आहेत. 1) 'Social Educater's Award'- by Open Page Education News Paper A'bad. January 19. 2) ' Appreciation Award ' for paper presentation in National Conference on Science and Technology of YOG . April 19 ३) मराठी वाड्मय परिषद, बडोदे. आयोजित विज्ञान विषयक निबंध स्पर्धेत द्वितीय पारितोषिक प्राप्त. स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सन्मानित, जून २०१९. मध्यवर्ती मंडळातर्फे त्यांचे अभिनंदन!

## कु. अनुश्री राम उमरेकर हिचे अभिनंदन



देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मंडळ अकोला कार्यकारणी सदस्य श्री. राम उमरेकर ह्यांची कन्या कु. अनुश्री राम उमरेकर हिस वाणिज्य शाखा १२वी परीक्षेमध्ये ९०% गुण मिळविल्याबद्दल गौरविण्यात आले व मध्यवर्ती मंडळातर्फे ही बक्षीस देण्यात आले. मध्यवर्ती मंडळातर्फे अभिनंदन!

## देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मंडळ, अकोला ह्यांचा कार्यक्रमाचा अहवाल



देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मंडळ शाखा अकोलाचा, दर वर्षी प्रमाणे यावर्षीचा गुणगौरव सोहळा रविवार दि. १४/०७/२०१९ रोझि प्रमिलाताई ओक सभागृह येथे दुपारी ३.३० ते ६.०० या वेळात मोठ्या थाटात संपन्न झाला. या वेळच्या सोहळ्याला अकोल्यातील प्रसीध्द श्री. शिवाजी महाविद्यालयाचे सांख्यिकी विभाग प्रमुख प्रा. डॉ. संजय त्र्यंबकरावजी खडक्कार हे प्रमुख पाहुणे म्हणुन लाभले. तसेच ते माजी तज्ञ सदस्य, विदर्भ वैधानिक विकास मंडळ, नागपुर, मा. राज्यपाल नामित माजी व्यवस्थापन परिषद सदस्य, नागपूर विद्यापिठ, नाशिक आदी पदे भुषविलेली आहेत. कार्यक्रमाचे संचलन श्री. प्रदिप वांगीकर यांनी केले. श्री. महाशब्दे, प्रमुख पाहुणे डॉ. संजयजी खडक्कार, सौ. खडक्कार व मंडळाचे मुख्य कार्यवाह श्री. अनय घोटीकर यांचे हस्ते सरस्वती पुजन व दिपप्रज्वलन करण्यात आले. यानंतर प्रमुख पाहुणे प्रा. खडक्कार यांचे स्वागत श्री. गणेश मैराळ यांनी तर सौ. खडक्कार यांचे स्वागत सौ. विशाखा देशमुख यांनी केले. तसेच मंडळाचे अध्यक्ष डॉ. महाशब्दे यांचे स्वागत श्री. माणिक जोशी यांनी व उपाध्यक्ष प्रा. व्ही. एल. देशपांडे यांचे स्वागत श्री. संजय जोशी यांनी व उपाध्यक्ष डॉ. सि. के. जोशी यांचे स्वागत श्री. राम उमरेकर यांनी केले. प्रा. संजयजी खडक्कार यांचा मंडळाचे अध्यक्ष श्री. महाशब्दे व सचिव श्री. अनय घोटीकर यांच्याहस्ते शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. तसेच सौ. खडक्कार यांचा सत्कार सौ. मंजुषा अनय घोटीकर यांनी शाल व श्रीफळ देऊन केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक म्हणजेच आता पर्यंतची मंडळाची वाटचाल सहकार्यवाह श्री. जयंत सरदेशपांडे यांनी मोजक्या शब्दात मांडली. मान्यवरांचा परिचय मंडळाच्या सदस्या सौ. मृणाल कुलकर्णी यांनी करुन दिला.

## रामदासी यांना रवींद्र भट स्मृती पुरस्कार



मोहनबुवा रामदासी श्रीपाद जोशी

पुणे, ता. १७ : महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे रवींद्र भट यांच्या स्मरणार्थ दरवर्षी संतसाहित्य क्षेत्रातील लक्षणीय योगदानाबद्दल दिला जाणारा पुरस्कार यंदा मोहनबुवा रामदासी यांना जाहीर करण्यात आला. तसेच डॉ. म. वि. गोखलेपुरस्कृत प्राचार्य शं. वा. तथा सोनोपंत दांडेकर स्मृती पुरस्कार, तत्त्वज्ञान/नीती/अध्यात्म/मानसशास्त्रविषयक ग्रंथाला दिला जातो. हा पुरस्कार "मानवी स्वभावाचे त्रिगुणात्मक विश्लेषण" या ग्रंथासाठी डॉ. श्रीपाद जोशी (इंदोर) यांना दिला जाणार आहे. ७ हजार ५०० आणि सन्मानपत्र असे या पुरस्कारांचे स्वरुप आहे. संतसाहित्याचे अभ्यासक डॉ. अभय टिळक यांच्या हस्ते आणि मसापचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी यांच्या अध्यक्षतेखाली हा पुरस्कार प्रदान समारंभ होईल. सोमवारी (ता.२२) सायंकाळी ६.३० वाजता महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या माधवराव पटवर्धन सभागृहात हा कार्यक्रम होणार आहे.

बडोदे दे. ऋ. ब्राह्मण मंडळाचा वर्धापन दिनाचा कार्यक्रम रविवार, दि. २५-८-२०१९ रोजी दुपारी ३.०० वा. श्री. सत्यनारायणाच्या पूजे पासून ब्राह्मण सभा, बडोदे येथे संपन्न होणारे आहे. या कार्यक्रमांतर्गत प्रविण विद्यार्थी कौतुक सोहळा, मंडळाच्या ज्येष्ठ सभासदांचा सत्कार व नवविवाहुत दांपत्यांचा सत्कार करण्यात येईल, त्याच प्रमाणे बडोद्याचे प्रसिद्ध स्वराधना ग्रुप द्वारे सुश्राव्य गाण्यांचा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानंतर सुमारे ८.३० वा. प्रीति भोजन ठेवण्यात आले आहे.

**श्री. मुकुंद गो. काळूस्कर, अध्यक्ष**

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील संशोधकांची कामगिरी : आंतरराष्ट्रीय अधिमान्यता

# मानवी जिनोमचे गूढ उलगडणारे मूलभूत संशोधन


डॉ. अभिजित कुलकर्णी


डॉ. समित चट्टोपाध्याय


डॉ. स्मृती मित्तल

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व इतर संशोधन संस्थांमधील संशोधकांच्या गटाने मानवी जिनोमच्या त्रिमितीय रचनेमध्ये कार्यरत असणाऱ्या महत्वाच्या अशा "स्कॅफोल्ड् / मॅट्रीक्स अटॅचमेंट रिजन्सचा स्मार) संपूर्ण आराखडा तयार करण्यात यश मिळविले आहे. त्याचबरोबर मानवी जिनोमशी, एड्स, कर्करोग यासारख्या व्याधींना कारणीभूत ठरणाऱ्या "रेट्रोव्हायरस" कुळातील विषाणूच्या संसर्गाचा असलेला नेमका संबंध शोधून काढण्याची कामगिरीही केली आहे. अशा प्रकारचा संबंध जगात पहिल्यांदाच शोधण्यात आला आहे. विद्यापिठाच्या जैवमाहितीशास्त्र विभागातील डॉ. अभिजीत कुलकर्णी, जैवतंत्रज्ञान विभागातील डॉ. स्मृती मित्तल, पुण्यातील राष्ट्रीय कोषिका विज्ञान केंद्र (एनसीसीएस) व कोलकाता येथील भारतीय रासायनिक जीवविज्ञान संस्थेचे (आयआयसीबी) डॉ. समित चट्टोपाध्याय यांच्यासह विद्यार्थी संशोधक नितीन नरवडे, सोनल पटेल व आफताब आलम यांच्या गटाने हे संशौधन केले आहे. याबाबतचा संशोधन प्रबंध ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेसच्या न्युक्लिक ॲसिडस रीसर्च जर्नल मध्ये जून २०१९ च्या अंकामध्ये प्रसिद्ध झाला आहे. त्यामुळे या संशोधनाला आंतरराष्ट्रीय पातळीवरील संशोधन समुदायाचीही अधिमान्यता मिळाली आहे. मागील चा वर्षापासून हे संशोधन सुरु होते. त्याच्या सुरुवातीच्या टप्प्यात संशोधकांनी बायोलॉजिकल डेटा मायनींग करत म्हणजेच उपलब्ध असलेल्या नोंदीच्या उपयोग करुन संपूर्ण मानवी जिनोममधील महत्वाचा घटक असलेल्या स्मारचा आराखडा तयार केला. त्यानंतरच्या टप्यामध्ये एचआयव्ही (एड्ससाठी कारणीभूत ठरणारा) व एचटीएलव्ही (कर्करोगासाठी कारणीभूत ठरणारा) यासारख्या विषाणूंची लागण असणाऱ्या १२ लाख नमुन्यांचा अभ्यास केला आहे. संशोधकांनी या नमुन्यांचे विश्लेषण करताना हा विषाणू व मानवी डीएनएच्या एकत्रिकरणाच्या प्रक्रियेचा संबंध बारकाईने अभ्यासला. त्याद्वारे हे घातक विषाणू मानवी स्मार व त्यांच्या त्रिमितीय संरचनेत कसे व कुठे प्रवेश करतात याचा उलगडा केला. त्यामुळे आता या विषाणूंच्या माणसाच्या डीएनए मधील शिरकावाबद्दलची माहिती पहिल्यांदाच जगापुढे आली आहे. **स्मार म्हणजे काय** : मानवी जीनोम हा पेशी केंद्रकाच्या आत एका विशिष्ठ पद्धतीने बसवलेला असतो. त्यासाठी डीएनए हा एका ठराविक घटकाला चिटकलेला असतो. त्याच्या भोवती एक वलय असते त्याला स्मार (स्कॅफोल्ड् / मॅट्रीक्स अटॅचमेंट रिजन्स) म्हणतात. एड्ससारख्या विषाणूजन्य आजारावरील तसेच, विशिष्ट प्रकारच्या कर्करोगावरील उपचार शोधण्यासाठी हे संशोधन उपयुक्त ठरेल. मानवी जिनोमची कार्यपद्धती समजून घेण्यासाठीही त्याचा उपयोग होणार आहे. भविष्यात जीवशास्त्रामधील अनेक क्लिष्ठ प्रश्न सोडविण्यासाठी जैवमाहितीशास्त्र उपयुक्त ठरत आहे व ते पुढेही अधिक उपयुक्त ठरेल. - **डॉ. अभिजित कुलकर्णी, संशोधक**


विलेपार्ले संलग्न संस्थेचा श्रावणी कार्यक्रम


हैद्राबाद संस्थेचा श्रावणी कार्यक्रम


कोथरुड संस्थेचा श्रावणी कार्यक्रम

## श्री. प्रदीप कुलकर्णी यांना भावपूर्ण श्रद्धांजली

देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मंडळ कार्यालय अकोला कार्यालयांत झालेल्या बैठखीत मंडळाचे अध्यक्ष श्री. महाशब्दे ह्यांचे अध्यक्षतेखाली मध्यवर्ती मंडळाचे कोषाध्यक्ष श्री. प्रदीप कुलकर्णी ह्यांनी केलेल्या कार्याचा गौरव करण्यात आला व भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. - **विजय देशमुख**

# संस्कृति संवर्धन मंडळ अहवाल

सन्माननीय सदस्य, सप्रेम नमस्कार. संस्थेच्या हिरकमहोत्सवी वर्षात २०१८-२०१९ चा वार्षिक अहवाक सादर करताना मला आनंद होत आहे. हिरकमहोत्सवी वर्षाचे उद्घाटन संस्थेचे अध्यक्ष प.पू.डॉ. ज्ञानराज माणिकप्रभू महाराज यांच्या हस्ते दि. १० फेब्रुवारी रोजी संपन्न झाले. यावेळी कृषि विज्ञान केंद्रामार्फत कृषि तंत्रज्ञान महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. याचे उद्घाटन राज्याचे कृषि व फलोत्पादन राज्यमंत्री मा. सदाभाऊ खोत यांच्या हस्ते करण्यात आले. पुणे येथील अखिल भारतीय लोककला सांस्कृतिक संघटन या संस्थेतर्फे बँकॉक, थायलंड येथे आयोजित आंतरराष्ट्रीय नृत्य, नाट्य व संगीत महोत्सवाकरिता श्री. छ. शिवाजी ज्युनियर कॉलेज विभागातील आशिष उस्केलवार या विद्यार्थ्याने स्पर्धेत सहभागी होऊन विशेष यश संपादन केले. युवा वैज्ञानिक कार्यक्रमांतर्गत इस्त्रोकडून भारतातून १०७ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली होती. यात इ. ९वी मधील गायत्री ठाकूरचा समावेश होता. बेंगलूरू येथे मे महिन्यात दोन आठवडे झालेल्या शिबिरात सहभागी होऊन गायत्रीने प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण केले. आयआयटी गुवाहटी येथील राष्ट्रीय रोबोझेस्ट स्पर्धा २०१९ मध्ये अटल टिंकरिंग प्रयोगशाठेतील विद्यार्थ्यांची प्रशिक्षणासाठी निवड करण्यात आली होती. यामध्ये आपल्या विद्यार्थ्यांनी टाकाऊ इलेक्ट्रॉनिक्स साहित्याचा वापर केला. या बालवैज्ञानिकांचा १० उत्कृष्ट रोबोटमध्ये समावेश करण्यात आला. माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत परिक्षा २०१९ मध्ये विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले. सगरोळी सनराईजच्या खेळाडूंनी ठाणे मॅराथॉन स्पर्धेत सहभागी होत आरती दुधे हिने ७वे स्थान पटकावले तर विष्णु लव्हाळे याने ६वा क्रमांक पटकावला. विविध विभागातील विद्यार्थ्यांनी मल्लखांब, जलतरण व इतर विविध स्पर्धेत सहभागी होऊन राज्यस्तरावर यश संपादन केले. संस्थेच्या इतिहासात प्रथमच सगरोळीसारख्या ग्रामीण भागात राज्यस्तरीय फुटबॉल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेची संस्थेने जय्यत तयारी केली होती. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनामुळे स्पर्धक, पालक, प्रशिक्षक व क्रीडा अधिकाऱ्यांनी संस्थेचे कौतुक केले. संस्थेचे चेअरमन श्री. प्रमोद देशमुख यांची अफार्म, पुणे या स्वयंसेवी संघटनेच्या अध्यक्षपदी एकमताने निवड करण्यात आली. अफार्मच्या माध्यमातून ग्रामीण विकासासाठी विविध कार्यक्रम व कार्यकर्त्यांच्या माध्यमातून संस्थांचे सक्षमीकरण केले जाते. मा. प्रमोद देशमुख यांचा सामाजिक क्षेत्रातील प्रदीर्घ अनुभव लक्षात घेऊन ही निवड करण्यात आली. भारत विकास संगम या राष्ट्रीय स्तरावर काम करणाऱ्या संस्थेच्या वतीने समाजिक क्षेत्रातील ग्रामीण विकासाच्या योगदानाची दखल घेऊन श्री. प्रमोद देशमुख यांचा बेंगलूरु येथे दि. ३ जून रोजी गौरव करण्यात आला. इन्स्पायर अवार्ड विज्ञान प्रदर्शनात स्वयंचलित स्वच्छतागृह या प्रकल्पाची राष्ट्रीय स्तरावर निवड होऊन नवी दिल्ली येथे या प्रकल्पातील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून यश संपादन केले. शाश्वत विकास कार्यक्रमाच्या माध्यमातून दुग्धव्यवसाय, शेळीपालन, कुक्कुटपालन, बचतगट निर्मिती, शेतीपुरक व्यवसायाचे प्रशिक्षण देऊन आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याच्या दृष्टीने संस्थेने अनेक योजना कार्यान्वित केल्या आहेत. संस्थेच्या प्रयत्नाने ग्रामस्वच्छता, महिलांचे आरोग्य शिबिर व योग्य जलव्यवस्थापन यामुळे ग्रामीण महिलांचे जीवनमान उंचावत आहे. ग्रामीण भागातील युवकांना रोजगार निर्मितीसाठी कृषि विज्ञान केंद्र व सिंजेंटा फाऊंडेशन इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने कृषि तंत्र सहाय्यक (एटीए) या ४५ दिवसांच्या अभ्यासक्रमास युवक-युवतींकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे. नाबार्डच्या अर्थसहाय्याने होट्टल, काठेवाडी ता. देगलूर व काटकळंबा ता. कंधार येथे पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमास सुरूवात झाली. या प्रकल्पामुळे दुष्काळग्रस्त भागातील भूजलस्तर उंचावण्यास मदत होईल. संस्थेच्या कृषि विज्ञान केंद्र व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. या करारान्वये नांदेड जिल्ह्यातील गावात कृषि विज्ञान केंद्र व विद्यापीठाच्या स्कूल ऑफ अर्थ सायन्स या भूगर्भशास्त्र विभागामार्फत नैसर्गिक साधनसंपत्तीचा विकास व व्यवस्थापन, कृषिआधारित संसाधनांचा विकास, जलव्यवस्थापन, जमीनीच्या वापराचे नियोजन, जैवविविधता, जल व भूपृष्ठावरील प्रदुषण, वातावरणातील बदल या क्षेत्रात विद्यापीठाचे तांत्रिक सहकार्य मिळेल. धन्यवाद

अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ चे अकोला येथील सदस्य विनोद जोशी (सभासद क्र. अ ३६३९) यांचे मातोश्री श्रीमती मालती श्रीकृष्ण जोशी यांचे दिनांक २२/७/२०१९ रोजी निधन झाले.

~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~

# नविन सभासदाचे नांव

**कराड. जि. सातारा:** (१) श्री.प्रभाकर कृष्णाजी उंब्रजकर (२) श्री.अरुण गोविंद पंचपोर (३) सौ. गौरी गौतम निलाखे (४) श्री. काशिनाथ धोंडो देशपांडे (५) श्री. निखिल परसाद आगवेकर (६) श्री. निरंजन गोविंद इनामदार (७) सौ. आरती निरंजन इनामदार (८) श्री. किशोर मुरलीधर काळे (९) श्री. गोविंद वासुदेव घळसासी (१०) श्री. मिलिंद पांडुरंग केसकर (११) सौ. संचिता सचिन गरुड (१२) श्री. सचिन राजाराम गरुड (१३) कल्याणी मंगेश बोरकर (१४) श्री. महेश सुरेश कुलकर्णी (१५) श्री. राजेश सुरेश काळे (१६) श्री. महेश श्रीकांत चांदोरकर (१७) श्री. अक्षय मोहन रुईकर (१८) श्री. प्रकाश विलास रुईकर (१९) श्री. अजय अरविंद कुलकर्णी (२०) श्री. संतोष गजानन देशपांडे (२१) श्री. सुधीर किसन कुलकर्णी (२२) श्री. संतोष विलास देशपांडे (२३) श्री. चंद्रशेखर महादेव देशपांडे (२४) श्री. अरुण पांडुरंग कुलकर्णी (२५) श्रेया सुयोग भिंताडे (२६) श्री. दिलीप गोपाळ जोशी (२७) श्री. दत्तात्रय गजानन पानसरे (२८) श्री. विनय विजय भोसेकर (२९) गायत्री विनय भोसेकर (३०) श्री. राजेश प्रकाश शेंडे (३१) श्री. संतोष प्रकाश शेंडे (३२) श्री. पुष्कर सतीश आळतेकर (३३) श्री. श्रीधर नारायण घळसासी (३४) श्री. श्रीकर विठ्ठल कुलकर्णी (३५) श्री. सुरेश एकनाथ कुलकर्णी (३६) त्रिशती दत्तात्रेय कुलकर्णी (३७) श्री. देवदत्त सुनिल फलटणकर (३८) श्री. शिशिर पंडीत कुलकर्णी (३९) सौ. संध्या संजय राजोपाध्ये (४०) श्री. संजय वसंतराव राजोपाध्ये (४१) सौ . मिनाक्षी दिलीप वाचासुंदर (४२) श्री. दिलीप शामराव वाचासुंदर (४३) श्री. प्रकाश वासुदेव जोशी (४४) सौ. स्मिता व्यंकटेश कुलकर्णी (४५) श्री. अच्युत बाळकृष्ण देशपांडे (४६) सौ. रसिका रविंद्र शेंबेकर (४७) श्री. अमित दीपक कुलकर्णी (४८) सौ. अमृता अमित कुलकर्णी (४९) श्रीमती संजिवनी शामराव कुलकर्णी (५०) श्री. अवधूत रामचंद्र गरुड (५१) सौ . मानसी अवधूत गरुड (५२) श्री. सिध्देश (शैलेश) विजयकुमार कुलकर्णी(५३) श्रुती सुनिल कुलकर्णी(५४) श्री. श्रीरंग मधुकर कुलकर्णी. **सांगली** : (५५) श्रीमती शुभदा संजय जोशी (५६) श्री. प्रथमेश संजय जोशी. **नृसिंहवाडी-कोल्हापूर:** (५७) श्री. विकास दिगंबर पुजारी (५८) श्री. विनोद भानुदास पुजारी (५९) श्री. बाळासाहेब गोविंद कुलकर्णी (६०) श्री. गिरीष रघुनाथ खोंबरे पुजारी (६१) श्री. मुकुंद सखाराम पुजारी (६२) श्री. संदिप मोहन वाडीकर (६३) ब्राह्मण सभा श्री क्षेत्र नृसिंहवाडी. **पुणे :** (६४) श्री. दत्तात्रय रामचंद्र जोशी (६५) श्री. सौरभ शरद ढेरे. **कुळगाव -बदलापुर :** (६६) श्री. दिलीप शेषाद्री कुलकर्णी (६७) श्री. रजनीकांत यशवंत मोहरीर (६८) सौ. मानसी पद्माकर चंदूरकर (६९) श्री. प्रमोद प्रभाकर महाशब्दे (७०) संध्या प्रदीप कुलकर्णी**. मुलुंड(पूर्व)** : (७१) सौ. कलावती श्रीकांत सरडे. **अक्कलकोट-सोलापूर :** (७२) श्री. रविंद्र गुंडाचार्य जोशी. **सोलापूर :** (७३) श्री. शशीकुमार विश्वंभर कुलकर्णी**. दादर (पश्चिम) :** (७४) श्री. गणेश नीलकंठ कुलकर्णी. **वर्धा :** (७५) श्री. विलास वसंतराव कुलकर्णी. **ठाणे :** (७६) श्री. संग्राम विलास जोशी. **पनवेल :** (७७) श्री. मकरंद सुनिल काटकर

---

श्री. अमित दिलीप पोतनीस, श्री. दिलफि श्रीनिवास पोतनीस, श्री. नंदकुमार लक्ष्मण जोशी, श्री. जगदीश मधुकर माढेकर, श्री. अमीर अरुण तडवळकर, श्री. गणेश भालचंद्र मैराळ, सौ. अवंतिका गणेश मैराळ, श्री. सुदर्शन सुधाकर देशपांडे, श्री. रोहित रमेश जोशी, श्री. विश्वास हरी कोरान्ने, सौ. सुधा भरत देशपांडे, श्री. भरत नागोराव देशपांडे, श्री. सुनिल प्रभाकरराव कुऱ्हेकर.

---

देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळाचे कोषाध्यक्ष श्री प्रदीप कुलकर्णी यांचे आकस्मिक दु:खद निधन दिनांक ५ जुलै २०१९ रोजी सकाळी सहा वाजता झाल्याची दु:खद बातमी कळली. मंडळाचे अध्यक्ष श्री विलास जोशी कार्याध्यक्ष श्री प्रभाकर कुलकर्णी सचिव श्री प्रसाद ठकार यांनी श्री प्रदीप कुलकर्णी यांचे बेळगाव येथील निवासस्थानी जाऊन त्यांच्या पत्नी, चिरंजीव, कन्या तसेच त्यांच्या बंधूंची भेट घेतली. कुलकर्णी परिवाराचे मध्यवर्ती मंडळाचे सर्व पदाधिकारी तसेच सर्व संलग्न संस्थांच्या वतीने सांत्वन केले व श्री प्रदीप कुलकर्णी ह्यांना भावपुर्ण श्रद्धांजली वाहिली. तसेच श्री प्रदीप कुलकर्णी यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो अशी प्रार्थना केली. मंडळाचे श्री प्रदीप कुलकर्णी यांच्या आकस्मिक निधनाने मोठे नुकसान झाले आहे असल्याचे नमूद करीत यापुढे कुठल्याही प्रकारची गरज लागल्यास मध्यवर्ती मंडळाचे सर्व जण आपल्या परिवाराच्या पाठीशी आहेत असा विश्वास दिला . मध्यवर्ती मंडळा प्रमाणेच सोलापूर ,विलेपार्ले, डोंबिवली ,मोहोळ ,ठाणे या संलग्न संस्थांनी श्री प्रदीप कुलकर्णी यांच्या आकस्मिक निधनाबद्दल शोक व्यक्त करून भावपुर्ण श्रद्धांजली वाहिली.

~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~

## ब्राह्मण समाजासाठी परशुराम आर्थिक विकास महामंडळाची लवकरच स्थापना - फडणवीस

सोलापूर- ब्राह्मण समाजातील विविध समस्या सोडवण्यासाठी लवकरात लवकर परशुराम आर्थिक विकास महामंडळाची स्थापना करण्याचे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्याची माहिती समस्त ब्राह्मण समाज समन्वय समितीचे समन्वयक प्रा. काकासाहेव उर्फ मनोज कुलकर्णी यांनी दिली. मुख्यमंत्री सोलापूर दौऱ्यावे आले असता प्रा. काकासाहेब कुलकर्णी यांनी त्यांची भेट घेऊन त्यांना विविध मागण्यांचे निवेदन दिले. २२ जानेवारी रोजी मुंबईतील आझाद मैदानावर समस्त ब्राह्मण समाजाच्या वतीने परशुराम आर्थिक विकास महामंपळाची स्थापना करणे, पौरोहित्य करणाऱ्या ब्राह्मणांना मानधन देणे, ब्राह्मण विरोधी लिखाणावर बदी घालेणे, पंढरपुरातील बडवे आणि उत्पात यांना पुन्हा मंदिरात सामावून घेणे यासह विविध मागण्यांसाठी आंदोलन केले होत. त्यावेळी आपण सर्व मागण्या मान्य केल्या. मात्र त्याची अंमलबजावणी अद्याप झाली नाही, असे कुलकर्णी यांनी सांगत मुख्यमंत्र्यांना निवेदन दिले. त्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्व मागण्या लवकरच मान्य करण्यात येतील असे सांगत परशुराम आर्थिक विकास महामंडळ लवकरात लवकर सुरु करु असे आश्वासन दिल्याचे कुलकर्णी यांनी सांगितले. मुख्यमंत्र्यांचे सचिव अभिमन्यू पवार यांनी मुख्यमंत्र्यांची भेट घेण्यासाठी सहकार्य केले. यावेळी शहर समन्वयक विक्रम डोनसळे, पौरोहित्य आघाडीचे मधुकर कुलकर्णी, उमेश काशीकर, युवा नेते अजित कुलकर्णी, सचिन वेणेगुरकर, श्याम पुजारी, अक्कलकोटचे योगेंद्र पुजारी यांच्यासह बहुसंख्य समाजबांधव उपस्थित होते.

## देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ, डोंबिवली

देऋब्रा संघ, डोंबिवली या संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार, दिनांक २५ ऑगस्ट २०१९ रोजी वक्रतुंड हॉल, ३रा मजला, गणेश मंदीर संस्थान, डोंबिवली (पूर्व) या ठिकाणी सायंकाळी ६.०० ते ८.०० ह्या वेळेत आयोजित करण्यात आली आहे. सभासद बंधू-भगिनींनी वेळेवर उपस्थित रहावे ही विनंती.

देऋब्राशिक्षणोतेजक संस्था मोहोळया संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. १४/७/२०१९ रोजी संपन्न झाले. प्रथम मध्यवर्ती मंडळाचे अध्यक्ष कै. माधवरराव अनगळ, कै. निनाद मांडवगणे नाशिक (स्ववॉर्डन लिडर) मोहोळ संस्थेचे मयत सभासद त्यांचे नातेवाईक १) कै. नारायण काशीनाथ झांवरे २) कै. उमाकांत झांबरे ३) श्रीमती लिलाताई कुलकर्णी ) श्रीमती सुमती जोशी यांना सर्व सभासदानी २ मिनिटे उबे राहुन श्रद्धांजली अर्पण केली.

### वर पाहीजे

**अपूर्वा मोहन बहिरट. ब्राह्मण पोटशाखा :** देशस्थ. **गोत्र :** बादरायण **जन्मतारीख :** ११ जुलै १९९३ पत्रिका पाहणार. **उंची :** ५ फुट, **रक्तगट:** A+ **आई/वडील आहेत. मंगळ नाही. शिक्षण :** ग्रॅज्युएट (बी.कॉम.) **व्यवसाय :** नोकरी. **भाऊ नाही / बहिण एक विवाहीत. वरसंबंधी अपेक्षा :** अनुरुप, निर्व्यसनी, मुंबई स्थित, उच्चशिक्षित, स्वतःचे घर. **संपर्क मोबाईल:** ९८७०७१४७३० **पत्रव्यवहारासांठी नांव व पत्ता:** सौ. सुलभा मोहन बहिरट, ३६६/२०, श्री साईनाथ हौ. सो., सेक्टर ३, चारकोप, कांदिवली (प), मुंबई - ६७.

## यश मिळविणे सोपे परंतु ते टिकविणे अवघड : देऋब्रातर्फे दहावी-बारावी गुणवंतांचा सत्कार

सोलापूर, दि. ७ ऑगस्ट जीवनात यश मिळविणे खूप सोपे आहे. मात्र ते यश टिकविणे आणि त्यामध्ये सातत्य राखणे खूप अवघड आहे. यशामध्ये जर सातत्य राखावयाचे असेल तर त्यासाठी कठोर परिश्रम, कोणत्याही विषयाच्या मुळाशी जावून ज्ञान घेणे, सातत्य, नियमितता, विश्वासार्हता आणि मोकळेपणा या गोष्टींची गरज असते, असे प्रतिपादन प्रा. अविनाश लावणीस यांनी केले. देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्थेच्यावतीने दहावी-बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार प्रा. लावणीस यांच्या हस्ते करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थाध्यक्ष प्रा.डॉ. श्रीकांत येळेगावकर होते. यावेळी व्यासपीठावर उपाध्यक्ष शंकरराव कुलकर्णी, दत्तात्रय आराध्ये, श्याम जोशी, विजय कुलकर्णी, सुशांत कुलकर्णी, झरेगावकर आदी होते. पुढे बोलताना प्रा. लावणीस म्हणाले, अलिकडील काळात वेळेचे नियोजन हा विषय अतिशय महत्त्वाचा झाला आहे. आजकाल मुलांचे वाचन कमी होऊन तासन्तास मोबाईलमध्ये गुरफटत चालला आहे. मुलांनी हाच वेळ पुस्तके वाचनात घालविला पाहिजे. मोबाईलवरील आलेले मेसेसही केवळ फॉरवर्ड केले जातात. आज अनेक मुले दहावीला ९० टक्क्यांपेक्षाही अधिक गुण घेतात. मात्र बारावीला त्यांची गुण घटलेले दिसून येतात. शेवटच्या वर्षाचा निकाल हाती आल्यानंतर त्याची गुणांची टक्केवारी पाहिली तर ती अक्षरशः ६० टक्क्याच्या आसपास असते. अनेकवेळेला न झेपल्यामुळे अनुत्तीर्ण होतात. हे घडण्याचे कारण म्हणजे चिकाटी, परिश्रम, सातत्य, विश्र्वसार्हता, विषयाच्या मुळाशी न जाणे आणि वेळेचे नियोजन केले जात नाही. पालकांबरोबर मोकळेपणाने बोलणे नाही ही कारणे आहेत.

# जीवनसाथी-सुयोग्य निवडीसाठी

पुनर्विवाह इच्छुक, मुंबईतील, परदेशातील
उच्च मध्यमवर्गीय, उच्चशिक्षित,
आर्मि, नेव्ही, डिफेन्स, किंचित व्यंगाची
किंवा पालकांत दोष असलेल्या स्थळांसाठी

★★★

**वेळ : रोज सकाळी ११ ते संध्याकाळी ५**

**शुक्रवारी बंद**

**संपर्क : २४३०५६०७**

**मेघा दामले**

इंद्रवदन, पद्माबाई ठक्कर रोड,
सेनाभवनसमोर, माहीम, मुंबई - ४०० ०१६.

# श्री. शरदचन्द्र देशपाण्डे

M.A.L.L.B.

**ADVOCATE**

Asst. Secretary L.I.C. of India Z. O. Hyd. (Retired)
H. No. 8-3-978/13, Shri Nagar Colony, Hyd.

Life Member : अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ, मुम्बई
Life Member : अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मण्डळ शाखा, हैद्राबाद
Life Member : मराठी ग्रंथ संग्रहालय, हैद्राबाद
Life Member : महाराष्ट्र मंडळ, तेलंगणा, हैद्राबाद
Life Member : मराठी साहित्य परिषद, तेलंगणा, हैद्राबाद
Life Member : बृहन् महाराष्ट्र मंडळ, नई दिल्ली.
Life Member : Sr. Citizen Seva Samithi, Hanuman Nagar, Hyd.
Treasurer : Sat Sri Keshav Swamy Seva Samithi, Hyd.
Life Member : Insurance Corporate Retired Employees Association
Life Member : Bharat Gunavardhak Sanstha, Hyderabad
Exe. Committee Member : Shankar Vachanalaya, Telengana, Hyd.

ISO 9001 : 2015 प्रमाणित

// अर्थ करी समर्थ //

# समर्थ सहकारी बँक लि.सोलापूर

प्रधान कार्यालय : अंत्रोळीकर शॉपिंग सेंटर, दत्त चौक, सोलापूर. फोन : ०२१७ - २७४४२१०, २७४४२१३, २७४४२१४

## २००० कोटींच्या मिश्र व्यवसायाकडे वाटचाल

✻ समर्थ बँकेच्या उपलब्ध सेवा ✻

MOBILE BANKING | RTGS/NEFT | IMPS | E-COM/POS | E- PAYMENT | FOREIGN CURRENCY EXCHANGE | LOCKERS | GAS SUBSIDY | BHARAT BILLPAY

**जेष्ठ नागरिकांसाठी व्याजदर ९% (१ वर्षासाठी)**

**३२ शाखांमधुन कार्यरत**

✻ मुंबई - दादर ०२२- २४३२४४०१/०२ ✻ कल्याण-०२५-१२२३२९२१/२३ ✻ ठाणे - ०२२-२१७३७७४७/४८ ✻ वाशी - ०२२-२७८८००१४/१५
✻ पुणे - शिवाजीनगर - ०२०-२५६५७५५६/२५६५७५६५ ✻ हडपसर - ०२०-२६८९०७१२/१३ ✻ चिंचवड - ०२०-२७३७१८१८/२७३७१११९
बाणेर ०२०-२७२९२५००/०१ ✻ कोथरुड- ७२७६०८२१०१/७२७६०७२१०२ ✻ सिंहगड रोड- ९८८१७११८३० ✻ पिंपरी-०२०-२७४१२९२१/२७४१३०३०
✻ कोल्हापूर - ०२३१- २५३११४४/४५ ✻ सांगली - ०२३३- २३०२०६५/६६ ✻ मार्केट यार्ड पुणे - ०२०- २९७०६५५०/२९७०५३५०

✻ सोलापूर शहर व जिल्ह्यात एकुण १८ शाखा कार्यरत ✻

IndusInd Bank

My ACCOUNT
My NUMBER

# Make your Birth Date
## as your Bank Account Number.

120000



Our Other Innovations

Indus Mobile
FINGER PRINT BANKING
Easy, Cool & Safe

VIDEO Branch

Choice Money ATM

QUICK REDEEM SERVICE

DIRECT CONNECT

CASH ON MOBILE ATM

CHECK ON CHEQUE

**For more details, please call our 24 x 7 Phone Banking Numbers : 1880 500 5004/ +91 22 4406 6666.**
**Altemately, you can visit our website : www.indusind.com**

MRH

Mukund R. Hulyalkar

painttech CONSULTANTS

**Generations Technology** **Changes BUT** **HULYALKAR SAME**

Visits :

**By Appointment Only**

Available on Phone

9.00 a.m. to 6.00 p.m. (For Local)

10.30 p.m. to 11.30 p.m. (For Outstation)

**Acrylic Distemper 2 Zinc Silicate**

**Complete Paint World**

**"Choice of Bright People"**

**Mukund R. Hulyalkar - Paint Technologist**

| | | |
|---|---|---|
| President | : | Deshastha Rugvedi Brahman Sangh, Dadar |
| I. P. President | : | Colour Society U.D.C.T. Mumbai |
| Secretary | : | Karnataka Progressive Education Society, Mahim, Mumbai |
| Convener | : | ISSPA Central Committee |
| Secretary | : | Govindashram Co-Op. Hsg. Society |
| Patron Member | : | Winner's Circle - Thane |
| Member | : | BIS Committee CHD 20, New Delhi |
| Award | : | Udyogshree By Maharashtra State Government / ISSP Mitra |

Govindashram, (Near Hari Niwas), 224, L. J. Road, Dadar, Mumbai 400 028.
Mobile : 9821099494, Tel. : 022-24456214, Fax : 022-24314865
E-mail : painttech_con@yahoo.com, Website : www.painttechconsultants.com

**R.N.I.16775/68 Regd. No. MCW-126/2018-20,** Published on 15th of every month, Posted at MUMBAI PATRIKA CHANNEL SORTING OFFICE, GPO, Mumbai - 400 001 on, 15th Day of every month.


# अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ

अद्यावत नूतनीकरण केलेली

सर्व सोयींनी उपलब्ध अशी दादर - माहीम विभागातील

## मंगल कार्यालये

- तळमजल्यावरील कै. राधाबाई कब्बूर वातानुकूलीत अद्यावत सोयीयुक्त सभागृह
- दुसऱ्या मजल्यावरील अद्यावत सोयीयुक्त सभागृह

### वैशिष्ट्ये

वधू-वरांसाठी खोल्या, स्वयंपाकासाठी किचन

मंगल कार्य ठरताच प्रथम खालील ठिकाणी चौकशी करून कार्यालय आरक्षित करा.

सोसायटीच्या सभा, संगीताचे कार्यक्रम, चर्चासत्रे, परिसंवाद, नाट्य-तालीम, सम्मेलन ह्यासाठी पण हॉल उपलब्ध

❖ ❖ ❖ ❖

**अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ**

लक्ष्मीनारायण बाग, बाळ गोविंददास मार्ग, माहीम, मुंबई - ४०० ०१६.

दुरध्वनी : २४३० २२ ७३ / २४३० ७५७३ ● Email : aadrbm@gmail.com


मुद्रक, प्रकाशक आणि संपादक समिती यांनी **अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळा**च्या वतीने **संदीप ग्राफीक्स, ठाणे (पश्चिम)** ४०० ६०१, येथे छापून **अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ**, लक्ष्मीनारायण बाग, बाळ गोविंददास मार्ग, माहिम, मुंबई - ४०० ०१६ येथून अंक प्रकाशित केला. **संपादक समिती.**